भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०७/२०१७

**१) मोबाईल शॉप दुकानाचे लोखंडी शर्टर वाकवुन आत प्रवेश करुन मोबाईल, कॅमेरे, टिव्ही चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ ते २०/०७/२०१७ चे ०५.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे क्रिष्णन मोबाईल शॉप दुकानाचे लोंखडी शर्टर वाकवुन आत प्रवेश करुन मोबाईल शॉपी दुकानातील सॅमसंग जे २/४ जी मोबाईल, सॅमसंग जे २ प्रो मोबाईल, सॅमसंग जे २ ACE मोबाईल, ZloF आस्टार ४ जी मोबाईल, ZloF आस्टार ४ जी मोबाईल असे एकुण ०५ मोबाईल तसेच हायक्वीन कं.०२ कॅमेरे, पोर्टेबल टिव्ही असा एकुण ४३,२५०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी अनिल मदन चिंदालोरे वय ३३ वर्ष, रा. नेहरुवार्ड मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) लग्नाचे आमिष दाखवुन मुलीवर अत्याचार करुन लग्न करण्यास टाळाटाळ केली व जबरी अत्याचाराबाबत कोणाला सांगितले तर जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

२०१३ ते ०५/०६/२०१७ चे २४.०० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असुन सन २०१३ पासुन त्यांचेत प्रेम संबंध होते आरोपी ने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन वेळोवेळी जबरी अत्याचार करुन लग्न करण्यास टाळाटाळ केली व जबरी अत्याचाराबाबत कोणाला सांगितले तर जिवाने मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७६(२)(एन),४१७,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो. स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) पॉलीसी काढण्याच्या नावावर बजाज अलायन्स कंपनीची व ईतर ग्राहकांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०४/२०१२ ते आजपावेतो यातील आरोपी याने स्वत:चे आर्थिक लाभ व्हावे या उद्देशाने डुपलीकेट बिमा पॉलीसी काढुन बजाज अलायन्स कंपनी व ईतर जखमी ईसम यांची फसवणुक केल्याने फिर्यादी चारुदत्ता रामचंद्र कादंळे वय ३६ वर्ष, बजाज कॉलोनी जनरल ईन्सुरंन्स उपशाखा नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,४६८,४७१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहण हयगयीने चालवुन समोरुन धडक दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०७/२०१७ चे १२.४० वा. दर. यातील आरोपी वाहण चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन मागे घेतांनी फिर्यादीचे चारचाकी वाहन क्र. एम. एच. ३६ एच ७०५७ ला समोरील भागास उपजिल्हा रुग्नालय साकोली येथे धडक दिल्याने फिर्यादी डॉक्टर उषा रामचंद्र डोंगरवार वय ५० वर्ष, रा प्रगतीकॉलोनी साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) मुरुम टाकण्याचे कारणावरुन गैरकायदयाची मंडळी जमवुन काठीने मारुन दुखापत केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०७/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी एकनाथ श्रावण मुनेश्वर वय ४८ वर्ष, रा. बाम्पेवाडा याचे घरा समोर मुरुम टाकल्याचे कारणा वरुन आरोपीतांनी संगनमत करुन व गैरकायदयाची मंडळी जमवुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे हातावर काठीने मारुन दुखापत केले व इतर आरोपींनी थापडबुक्यांनी मारपीट करुन जिवाने मारण्याची दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४३,१४७,३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) चारचाकी वाहन समोरुन येवुन मोटार सायकलला धडक देवुन मागे बसलेल्यास जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे १९.४५ वा. दर. यातील फिर्यादी जखमी गोविंदा उध्दव नेवारे वय २६ वर्ष, रा. राणीलक्ष्मीबाई हा मित्र अपुर्ण मडावी वय २४ वर्ष, रा.भंडारा याचेसह आपले हिरो मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ९५५३ ने खामतलाव कडील जिम कडे जात असतांना समोरुन विरुध्द दिशेने येणाऱ्या आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल धडक मारुन फिर्यादी व त्याचे मित्रास जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि.सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील मृतक विशाल राजीराम रोहणकर वय ३५ वर्ष, रा. पाऊलदौना याने दारुचे नशेत पत्नी बबिता विलास रोहणकर हिचे सोबत घरगुती कारणावरुन भांडण व मारपीट करुन घरचे लोक झोपले असतांना घराचे छपराचे मयालीला दुपटयाने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी सौ. माधुरी रोशन शेंडे वय २६ वर्ष, रा. पाऊलदौना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**८) विषारी सापाने द्वंश केल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २०/०७/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील मृतक यशवंत नत्थु रुकमोडे वय ४० वर्ष, रा. वलमाझारी हा शेतातील रोवणी करीता फावडयाने धुऱ्याचा कचरा साफ करीत असतांनी कोणत्यातरी विषारी सापाने मृतकचे डाव्या पायाचे अंगठयाला चावल्याने त्यास उपचाराकरीता सरकारी दवाखाना साकोली येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी वामन नत्थु रुकमोडे वय ४७ वर्ष, रा. पाऊलदौना यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेराम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**९) किटकनाशक औषध प्राशन केल्याने उपचारा इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २९/०७/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील मृतक रामदास विठोबा बागडे वय ३५ वर्ष, रा. पालोरा हा दिनांक २९/०६/२०१७ रोजी घरी किटकनाशक औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा कामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०५/०७/२०१७ ला मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर शहर येथील मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भोगे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

१०) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—

दिनांक २०/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, तुमसर, साकोली, अडयाळव तुमस र येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु + ४५ किलो सडवा मोहा + साहित्य किंमती ७३५०/—रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु किंमती ८४०/—रु. तसेच जुगारातुन किंमती ४१२/—रु. असा एकुण किंमती ८६०२/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २०/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १११ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.